**<u>वादी तर्फे सा.क्र.१ चंद्रकांत तुकाराम केळुसकर यांचा उलटतपास प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. के.के.मराठे यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे एकूण क्षेत्र १५.९ गुंठे इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीची मूळ मालकी लोके कुटुंबियांकडे होती. हे म्हणणे खरे आहे की, की, लोके कुटुंबियामध्ये शिवराम जयाजी लोके, भिसाजी बाळकृष्ण लोके व महादेव बाळकृष्ण लोके असे तीन बंधू होते. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती पैकी दिड गुंठे क्षेत्र मिठागरा करिता दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मिठागरा करिता दिलेली जागा ही दगड, मातीच्या भिंती व पत्रा, छप्पर असलेल्या घराचा इमला होता. हे म्हणणे खरे नाही की, १९५६ च्या सुमारास मिठबाव येथील फिशरीज सोसायटी या संस्थे करिता मिठागरा करिता सदर जागा देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये मिठागर या संस्थे मार्फत अनेक वर्ष चालवले जात होते. हे म्हणणे खरे नाही की, जेव्हा संबंधीत संस्थेने मिठागर दुसऱ्या जागेत हलवले त्यावेळेस मिठागरा करिता देण्यात आलेली जागा लोके कुटुंबियांना परत देण्यात आली.

१६. असा कोणताही कागद नाही जो मला हजर करावयाचा होता परंतु हजर करणे राहून गेले आहे. मला भविष्यात कोणी साक्षीदार तपासायचा नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये माझ्या मागणी वरुन कोर्ट कमिशन नकाशा तयार करण्यात आला होता. प्रस्तुत नकाशावर मी दि.२०/११/२०१९ रोजी न्यायालयात म्हणणे दाखल केलेले नाही. मी प्रस्तुत दाव्यातील सर्व कागदपत्रे साक्ष देण्या पुर्वी पाहिलेली आहेत. मी वकिलांना कोर्ट कमिशनच्या नकाशावर म्हणणे द्या असे सांगितले होते अगर कसे हे मला आठवत नाही. आता मला नि.क्र.३४ येथील कागद दाखविण्यात आला. परंतु माझ्या दोन्ही डोळयांचे ऑपरेशन झाले असल्यामुळे मला अंधुक दिसते.

(साक्षीदार यांच्या विनंती वरुन व दोन्ही पक्षकारांच्या वकिलांच्या संमती वरुन **उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकूब...** )

श्रवणोत्तर स्विकृत

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.११/०३/२०२६